<u>निवडसूची सन २०१४-१५</u>
पोलीस उप अधिक्षक/सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) या संवर्गात पदस्थापना.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन आदेश क्र: रापोसे-१७१६/प्र.क्र.०१/पोल-१अ,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
दिनांक :-२२ जानेवारी, २०१६.

<u>संदर्भ</u>:- १. पोलीस आस्थापना मंडळ क्र. यांची दि. २२.१२.२०१५ रोजीची बैठक.
२. शासन आदेश क्र. रापोसे १३१५/प्र.क्र.२३४/पोल-१(अ), दि. ३१.१२.२०१५.

शासन आदेश :-

पोलीस उप अधिक्षक/सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) या पदावर पदोन्नती देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या सन २०१४-१५ च्या तदर्थ निवडसूचीमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या नि:शस्त्र पोलीस निरीक्षक संवर्गातील अधिकाऱ्यास संदर्भाधीन शासन आदेशान्वये पदोन्नती देण्यात आली आहे. सदरहु अधिकाऱ्याची त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी पदस्थापना करण्यात येत आहे:-

अ. क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	नि:शस्त्र पोलीस निरीक्षक या पदावरील नियुक्तीचे ठिकाण	नवीन नियुक्तीचे ठिकाण
१	श्री. शिवशंकर रामराव मुंढे	पोलीस निरीक्षक, टी.आर. टी.आय., औरंगाबाद	सहायक पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर

२. उपरोक्त अधिकाऱ्याविरूध्द विभागीय / संक्षिप्त / प्राथमिक चौकशी / न्यायालयीन कार्यवाही, प्रलंबित / प्रस्तावित असल्यास, सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २ एप्रिल, १९७६ च्या परिपत्रकामधील तरतुदीनुसार, त्यांच्याविरूध्द प्रलंबित / प्रस्तावित / संक्षिप्त / प्राथमिक चौकशीअंती त्यांना शिक्षा झाल्यास, सदर शिक्षा ते पदोन्नतीच्या पदावर भोगण्यास तयार असल्याचे हमीपत्र त्यांच्याकडून घेऊनच त्यांना पदोन्नती देण्यात यावी.

३. उपरोक्त पदोन्नती, मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल याचिका क्र: २७९७/२००४ व याचिका क्र.४७०/२००५ मधील अंतिम निर्णयाच्या, तसेच, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

४. पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आलेल्या पदांवर मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण अथवा अन्य मा. न्यायालयाचे स्थगिती आदेश असल्यास, ते विचारात घेऊन उक्त अधिकाऱ्यास पदस्थापना देण्यात यावी.

५. उक्त पदोन्नती देण्यात आलेल्या अधिकाऱ्यास, सध्याच्या पदावरून कार्यमुक्त करून, त्यांना पदोन्नतीच्या पदावर रूजू होण्यासाठी महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी आवश्यक ती कार्यवाही त्वरित करावी.

६. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०१६०११४१६००४४७७२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Charushila Chandrakant Tambekar

Digitally signed by Charushila Chandrakant Tambekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Joint Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2b0496c0c213a3f50c6522cc39ae5de95e1150ac3287e89c21b1422e313820a2, cn=Charushila Chandrakant Tambekar
Date: 2016.01.22 15:15:17 +05'30'

(चारुशीला तांबेकर)
सह सचिव, गृह विभाग.

प्रति,

महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रतिलिपि,

१) महालेखापाल -१ (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. राज्यमंत्री (गृह) (शहर/ग्रामिण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) पोलीस आयुक्त, औरंगाबाद
५) जिल्हा कोषागार अधिकारी, औरंगाबाद
६) सामान्य प्रशासन विभाग (कार्या.१२), मंत्रालय, मुंबई.
७) संबंधित अधिकारी (पोलीस महासंचालक यांचेमार्फत)
८) निवडनस्ती (कार्या. पोल-१अ).